
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। बुधवार, दि. १३ मे २०२६ । वर्ष १ । अंक ३८ । पाने २। DIGITAL EDITION

चीनला अमेरिकेच्या कार बाजारपेठेत प्रवेश देऊ नये!

(पान २ वर)



## » Selected

### शासकीय डॉक्टरांवर सरकार मेहेरबान

मुंबई: राज्य सरकारच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने आरोग्य सेवा आयुक्तालयांतर्गत कार्यरत असलेल्या गट-अ मधील वरिष्ठ डॉक्टरांबाबत सकारात्मक निर्णय घेतला आहे. या अधिकाऱ्यांच्या वयाच्या ५०/५५ व्या वर्षानंतर किंवा ३० वर्षांच्या सेवेनंतर करण्यात आलेल्या 'सेवा पुनर्विलोकनात' त्यांना पात्र ठरवण्यात आले आहे. त्यामुळे त्यांची सेवा पुढे सुरू ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम १० (४) व ६५ नुसार, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अकार्यक्षम किंवा संशयास्पद सचोटी असलेल्या कर्मचाऱ्यांना वयाच्या ५०/५५ व्या वर्षी अथवा ३० वर्षांच्या सेवेनंतर मुदतपूर्व सेवानिवृत्त करण्याचे शासनाचे धोरण आहे. अधिकाऱ्यांच्या कामाचे मूल्यमापन करण्यासाठी प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या अध्यक्षतेखाली 'विभागीय पुनर्विलोकन समिती' स्थापन करण्यात आली होती.

## पेट्रोल-डिझेल काटकसरीचे पंतप्रधानांचे पुन्हा आवाहन

# इलेक्ट्रिक वाहनांकडे वळणे काळाची गरज!

### इंधनाच्या प्रत्येक थेंबाची बचत म्हणजे देशाच्या मौल्यवान परकीय चलनाची बचत : पंतप्रधान नरेंद्र मोदी

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली | प्रतिनिधी : पश्चिम आशियातील वाढता तणाव आणि जागतिक इंधन पुरवठा साखळीवर होणारे परिणाम लक्षात घेता, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना पेट्रोल आणि डिझेलचा वापर कमी करण्याचे पुन्हा एकदा कळकळीचे आवाहन केले आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेवरील ताण कमी करण्यासाठी नागरिकांनी वैयक्तिक स्तरावर काटकसर करणे गरजेचे असल्याचे पंतप्रधानांनी म्हटले आहे.**

"इंधनाच्या प्रत्येक थेंबाची बचत म्हणजे देशाच्या मौल्यवान परकीय चलनाची बचत आहे," असे सांगत त्यांनी या मोहिमेला राष्ट्रहिताशी जोडले आहे. पंतप्रधानांनी आपल्या आवाहनात वाहतुकीच्या पर्यायी आणि आधुनिक साधनांवर विशेष भर दिला आहे. नागरिकांनी दैनंदिन प्रवासासाठी वैयक्तिक वाहनांचा वापर शक्य तितका टाळून खालील पर्यायांचा अवलंब करावा, अशी सूचना त्यांनी केली आहे -

* **मेट्रो आणि ई-बस:** शहरांतर्गत प्रवासासाठी मेट्रो रेल्वे आणि इलेक्ट्रिक बस यांसारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा (पब्लिक ट्रान्सपोर्ट) जास्तीत जास्त उपयोग करावा.

* **कारपूलिंग:** कार्यालयीन किंवा व्यावसायिक कामासाठी एकाच मार्गावर जाणाऱ्या नागरिकांनी 'कारपूल' पद्धतीचा वापर करून इंधन आणि पैसे वाचवावेत.

* **इलेक्ट्रिक वाहने (ईव्ही):** भविष्यातील ऊर्जा सुरक्षेसाठी आणि प्रदूषणावर मात करण्यासाठी इलेक्ट्रिक वाहनांकडे वळणे हे काळाची गरज आहे.

* **वर्क फ्रॉम होम:** जागतिक इंधन संकट आणि वाढत्या दरांच्या पार्श्वभूमीवर, ज्या क्षेत्रांमध्ये शक्य आहे तिथे 'वर्क फ्रॉम होम'चा अवलंब करावा, अशी सूचना पंतप्रधानांनी केली आहे. यामुळे कार्यालयात जाण्यासाठी लागणारे इंधन वाचेल आणि पर्यायाने देशाच्या परकीय चलनाचीही बचत होईल.


* **शाळांचे ऑनलाईन क्लासेस:** इंधन बचतीचा एक मार्ग म्हणून शाळांनी शक्य असल्यास ऑनलाईन क्लासेस पुन्हा सुरू करण्यावर भर द्यावा, असे पंतप्रधानांनी म्हटले आहे. यामुळे शाळांच्या बस आणि पालकांच्या खासगी वाहनांच्या फेऱ्या कमी होऊन मोठ्या प्रमाणात इंधन वाचवता येईल.

* **डोमेस्टिक हॉलिडे (स्वदेशी पर्यटन):** परदेशातील महागड्या पर्यटन सहलींऐवजी भारतीयांनी आपल्या देशातीलच पर्यटन स्थळांना प्राधान्य द्यावे (डोमेस्टिक हॉलिडेज). यामुळे स्थानिक पर्यटनाला चालना मिळून देशाच्या अर्थव्यवस्थेत भर पडेल आणि आंतरराष्ट्रीय प्रवासावर होणारा खर्च वाचवता येईल.

* **परदेशात भारतीयांना आवाहन:** परदेशात राहणाऱ्या प्रत्येक भारतीयाने किमान पाच परदेशी नागरिकांना (पर्यटकांना) भारताला भेट देण्यासाठी प्रोत्साहित करावे. जेव्हा परदेशातील भारतीय 'ब्रँड ॲम्बेसेडर' म्हणून काम करतील, तेव्हाच देशाच्या पर्यटनाला आणि अर्थव्यवस्थेला मोठी गती मिळेल, असे पंतप्रधानांनी नमूद केले आहे.

#### ईव्ही क्षेत्राला मोठे बळ मिळण्याची शक्यता

भारताची ऊर्जा क्षेत्रातील 'आत्मनिर्भरता' केवळ सरकारी धोरणांवर नाही, तर नागरिकांच्या सामूहिक प्रयत्नांवर अवलंबून आहे. देशातील मेट्रोचे विस्तारणारे जाळे आणि ई-वाहनांसाठी तयार होत असलेली इकोसिस्टम याचा लाभ सर्वसामान्यांनी घ्यावा, जेणेकरून जागतिक तेल संकटाचा भारतीय बाजारपेठेवर होणारा परिणाम मर्यादित राखता येईल. पंतप्रधानांच्या या भूमिकेमुळे आगामी काळात सार्वजनिक वाहतूक आणि ईव्ही क्षेत्राला मोठे बळ मिळण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.



जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

## दोन महिन्यांचे रखडलेले वेतन अखेर मार्गी लागणार

### माध्यमिक शिक्षक संघटना आक्रमक

**जन सम्राट टाईम्स**

**एरंडोल | प्रतिनिधी:** जळगाव जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक अनुदानित तसेच अंशतः अनुदानित शाळांतील शिक्षकांचे मार्च आणि एप्रिल २०२६ या दोन महिन्यांचे रखडलेले वेतन अखेर मार्गी लागण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. माध्यमिक शिक्षक शिक्षकेतर संघटना समन्वय समितीच्या पदाधिकाऱ्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) कल्पना चव्हाण यांची भेट घेऊन निवेदन सादर करत तातडीने वेतन अदा करण्याची मागणी केली. शालार्थ प्रक्रियेमधील त्रुटींमुळे अनेक शिक्षकांचे वेतन दोन महिन्यांपासून रखडले असल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले. उच्च न्यायालयाने वेतन पूर्ववत करण्याचे स्पष्ट आदेश दिलेले असतानाही प्रशासनाकडून कार्यवाही होत नसल्याबद्दल पदाधिकाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. शिक्षकांवर विमा, पतसंस्था, बँक कर्जाचे हप्ते तसेच कुटुंबाच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी असल्याने वेतन रखडल्यामुळे आर्थिक आणि मानसिक तणाव वाढल्याचे समितीने स्पष्ट केले. या पार्श्वभूमीवर शिक्षक आमदार किशोर दराडे यांनीही दूरध्वनीद्वारे शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण



यांच्याशी संपर्क साधून वेतन तातडीने अदा करण्याच्या सूचना दिल्या. यावेळी शिक्षणाधिकारी कल्पना चव्हाण यांनी सकारात्मक भूमिका घेत वेतन अधीक्षकांशी तातडीने चर्चा केली.

> "सध्या शिक्षक शिक्षकेतरांना एक प्रशासनाकडून जनगणना तसेच बीएलओ च्या माध्यमातून एस आय आर चे काम आणि दुसरीकडे हक्काचे वेतन वेळेवर मिळत नसल्याने प्रचंड असंतोषाचे वातावरण आहे. शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी बंधू-भगिनींना त्यांच्या हक्काच्या वेतनासाठी अशा प्रकारे वारंवार निवेदन देणे व त्या माध्यमातून प्रशासनासोबत संघर्ष करणं हे अतिशय दुःखद आहे.
>
> - श्री तुळशीराम सोनवणे, समन्वयक माध्यमिक शिक्षक शिक्षकेतर संघटना समन्वय समिती जळगाव जिल्हा.

## राहुल गांधी-विजय इंस्टाग्राम रील ब्लॉक

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली | प्रतिनिधी :** तामिळनाडूचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय (थलपती विजय) यांच्या शपथविधी सोहळ्याला लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी हजेरी लावली होती. या ऐतिहासिक सोहळ्यानंतर राहुल गांधी यांनी मुख्यमंत्री विजय यांच्यासोबतचा एक 'रील' आणि काही फोटो इंस्टाग्रामवर शेअर केले होते.

अवघ्या काही तासांतच या रीलला १२ दशलक्षहून अधिक व्ह्यूज मिळाले, मात्र अचानक इंस्टाग्रामने ही पोस्ट 'ब्लॉक' केल्याने मोठा राजकीय वाद निर्माण झाला. राहुल गांधी यांनी स्वतः या ब्लॉक झालेल्या पोस्टचा स्क्रीनशॉट शेअर करत, "थिरू विजय आणि माझ्यातील रीलमध्ये सरकारला नक्की काय धोका वाटला? आयटी नियमांतर्गत ही पोस्ट का रोखण्यात आली?" असा संतप्त सवाल विचारला.

काँग्रेसने हा विरोधी पक्षाचा आवाज दाबण्याचा प्रयत्न असल्याचे सांगत थेट केंद्र सरकार आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयावर निशाणा साधला. या वादानंतर केंद्र सरकारच्या माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने तातडीने स्पष्टीकरण देत काँग्रेसचे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. मंत्रालयाच्या अधिकृत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राहुल गांधी यांची पोस्ट ब्लॉक करण्यामागे केंद्र सरकारचा कोणताही हस्तक्षेप किंवा आदेश नव्हता. इंस्टाग्रामच्या (मेटा) अंतर्गत स्वयंचलित 'कंटेंट मॉडरेशन' सिस्टममधील तांत्रिक त्रुटीमुळे ही पोस्ट चुकीच्या पद्धतीने फ्लॅग होऊन ब्लॉक झाली होती. मेटाने देखील हे मान्य केले असून, काही तासांच्या तांत्रिक दुरुस्तीनंतर राहुल गांधी यांचे रील आणि फोटो पुन्हा एकदा सार्वजनिक करण्यात आले आहेत.

## 'नीट'ला पेपरफुटीचे ग्रहण; १३ संशयित ताब्यात


**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली | प्रतिनिधी :** नुकत्याच पार पडलेल्या देशातील सर्वात मोठ्या वैद्यकीय प्रवेश परीक्षेवर (नीट-युजी) पुन्हा एकदा पेपरफुटीचे सावट निर्माण झाले आहे. राजस्थानमधील सीकर जिल्ह्यातून सुरू झालेल्या या वादात, परीक्षेच्या सुमारे ४२ तास आधी सोशल मीडियावर एक 'गेस पेपर' व्हायरल झाल्याचा दावा केला जात आहे. प्राथमिक तपासात धक्कादायक माहिती समोर आली असून, या व्हायरल प्रश्नसंचातील जीवशास्त्र आणि रसायनशास्त्र विषयांचे सुमारे १०० ते १५० प्रश्न प्रत्यक्ष परीक्षेशी तंतोतंत जुळत असल्याचे दिसून आले आहे. ७२० गुणांपैकी सुमारे ६०० गुणांचे प्रश्न या साहित्याशी साधर्म्य दर्शवत असल्याने परीक्षार्थी आणि पालकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या प्रकरणाचा तपास राजस्थान पोलिसांच्या 'स्पेशल ऑपरेशन्स ग्रुप' (एसओजी) कडून अत्यंत वेगाने सुरू आहे. पोलिसांनी आतापर्यंत सीकर, झुंझुनू आणि डेहराडून येथून १३ संशयितांना ताब्यात घेतले आहे. तपासादरम्यान असे समोर आले की, केरळमध्ये वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थ्याने हा प्रश्नसंच १ मे रोजी सीकरमधील आपल्या मित्राला पाठवला होता, जिथून तो व्हॉट्सॲप आणि विविध कोचिंग सेंटर्सच्या माध्यमातून वेगाने पसरला. या पेपरसाठी २० हजार रुपयांपासून २ लाख रुपयांपर्यंतची मागणी करण्यात आल्याचे वृत्त आहे. या प्रकरणाचे धागेदोरे महाराष्ट्रातील लातूरपर्यंत पोहोचल्याची शक्यता वर्तवली जात असून, तेथील काही कोचिंग इन्स्टिट्यूटमधील हालचालींवरही पोलीस लक्ष ठेवून आहेत.

## विल्हाळे शिवारात झाडाझुडपांना भीषण आग

### अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे केळीबागा मोठ्या नुकसानीपासून बचावल्या

**जन सम्राट टाईम्स**



**वरणगाव | प्रतिनिधी:** भुसावळ तालुक्यातील विल्हाळे शिवारात सोमवारी दुपारी अचानक झाडाझुडपांना आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. विल्हाळे तलावाकडे जाणाऱ्या नाल्यालगत लागलेल्या या आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केल्याने जवळील केळीबागांना मोठा धोका निर्माण झाला होता. मात्र वरणगाव नगरपालिकेच्या अग्निशमन दलाने वेळीच धाव घेत आग आटोक्यात आणल्याने मोठी हानी टळली. सोमवारी दुपारी सुमारे २ वाजेच्या सुमारास ही घटना घडली. उन्हाची तीव्रता आणि परिसरातील कोरडी झुडपे व गवत यामुळे आग झपाट्याने पसरू लागली. आगीच्या ज्वाळा वाढत असल्याचे लक्षात येताच परिसरातील शेतकरी आणि नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. वाऱ्याचा वेग अधिक असल्याने आग थेट शेतीपर्यंत पोहोचण्याची भीती निर्माण झाली होती. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये काही काळ घबराटीचे वातावरण होते. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच वरणगाव नगरपालिकेचे अग्निशमन दल तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन कर्मचाऱ्यांनी पाण्याचा जोरदार मारा करत आग नियंत्रणात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. स्थानिक नागरिकांनीही आग विझविण्यासाठी मदत केली. अखेर मोठ्या प्रयत्नांनंतर आग पूर्णपणे आटोक्यात आणण्यात यश आले. या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी मोठ्या प्रमाणात झाडाझुडपे आणि कोरडे गवत जळून खाक झाले. सुदैवाने जवळील केळीबागा मोठ्या नुकसानीपासून वाचल्या. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. उन्हाळ्याच्या दिवसांत वाढती उष्णता आणि कोरडे गवत यामुळे अशा प्रकारच्या आगीच्या घटना वाढत असल्याने नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## म्हसवे शिवारात रसायनयुक्त पदार्थांचा अवैध साठा उघड!

### हायवे हॉटेलमागे पोलिसांचा छापा

**सुरेश पाटोळे**
**जन सम्राट टाईम्स**

**पारोळ | प्रतिनिधी :** पारोळा तालुक्यातील म्हसवे शिवारात राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ लगत रसायनयुक्त पदार्थांची अवैधरित्या साठवणूक केल्याप्रकरणी पारोळा पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. रामदेव राजस्थानी चौधरी हायवे हॉटेलच्या मागील बाजूस झाडाझुडपांमध्ये असुरक्षितरीत्या रसायनयुक्त पदार्थांचा साठा आढळून आल्याने सोमवारी गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, म्हसवे शिवारातील आरोपी दिनेश पाटील यांच्या मालकीच्या हॉटेलच्या मागे पत्र्याच्या शेडच्या आडोशाला कोणताही शासकीय परवाना नसताना रसायनयुक्त पदार्थ साठवून ठेवण्यात आले होते.

प्राथमिक चौकशीत हे रसायन 'सोडियम बाय सल्फाईड लिक्विड' असल्याचे समोर आले असून ते काळ्या बाजारात विक्री करण्याच्या उद्देशाने साठवण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या ठिकाणी रसायनांचा साठा अत्यंत असुरक्षित पद्धतीने करण्यात आला होता. त्यामुळे नागरिकांच्या जीवितासह मालमत्तेलाही धोका निर्माण होण्याची शक्यता होती. माहिती मिळताच पारोळा पोलिस निरीक्षक अशोक पवार यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने घटनास्थळी छापा टाकला.

छाप्यात पांढऱ्या रंगाचे रसायनयुक्त टँकर, लोखंडी पत्र्याजवळ ठेवलेले अर्धवट भरलेले टँकर, निळ्या रंगाच्या टाक्या तसेच इतर साहित्य आढळून आले. पोलिसांनी घटनास्थळावरून तब्बल ९ लाख ३२ हजार १२५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालात ४ लाख ५० हजार रुपये किमतीचे



टाटा कंपनीचे बारा चाकी टँकर, ९१ हजार रुपये किमतीचे रासायनिक पदार्थाने भरलेले अर्धवट टँकर, २ लाख ४ हजार ७५० रुपयांच्या रासायनिक पदार्थ भरण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या टाक्या, १ लाख ३६ हजार ५०० रुपये किमतीचे जुने टँकर, १५ निळ्या रंगाच्या टाक्या, मोटारसायकल, मोबाईल, रिकामे टँकर आणि इलेक्ट्रिक मोटारचा समावेश आहे. या प्रकरणी पुरवठा अधिकारी शिवकुमार निरगुडे यांच्या फिर्यादीवरून पारोळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक योगेश महाजन करीत आहेत.

#### पोलिसांच्या विशेष पथकाची कारवाई

ही कारवाई जळगाव स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस उपअधीक्षक प्रशांत दरेकर, उपविभागीय पोलिस अधिकारी विनायक कोते, पोलिस निरीक्षक अशोक पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यामध्ये पोउपनिरीक्षक योगेश महाजन, अमोल दुकळे, हवालदार डॉ. शरद पाटील, महेश पाटील, संदीप सातपुते, संजय पाटील तसेच कॉन्स्टेबल आशिष गायकवाड, भूषण पाटील आणि मयूर पाटील यांच्या पथकाने सहभाग घेतला.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज ज

## वारंवार वीज खंडितीविरोधात खडवलीत शंभूदुर्ग संघटनेचा मोर्चा

### महावितरण कार्यालयावर नागरिकांचा संताप; तातडीने उपाययोजनांची मागणी

**जन सम्राट टाईम्स**

**कल्याण :** खडवली आणि परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून वारंवार होत असलेल्या वीज पुरवठा खंडितीमुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी शंभूदुर्ग संघटनेच्या नेतृत्वाखाली महावितरण कार्यालयावर भव्य निषेध मोर्चा काढला. या वेळी महावितरणच्या भोंगळ कारभाराविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली तसेच विविध मागण्यांचे निवेदन अधिकाऱ्यांना देण्यात आले. शंभूदुर्ग संघटनेचे ठाणे जिल्हाध्यक्ष सागर मोरे, राज्य संघटक संजय पाटील, महिला अध्यक्षा जयवंती लोणे आणि उपजिल्हा अध्यक्षा वैशाली पाटील यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा काढण्यात आला. खडवली महावितरण कार्यालयात कनिष्ठ अभियंता योगेश चेंदवनकर यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात वीज पुरवठा तातडीने सुरळीत करणे, जुनी व नादुरुस्त वीजवाहिनी बदलणे, विजचोरी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे, नवीन ट्रान्सफॉर्मर बसवताना योग्य जागेची निवड करणे, तसेच जुने मीटर बदलून नवीन मीटर बसविण्याची मागणी करण्यात आली. परिसरातील विविध तांत्रिक अडचणी तातडीने दूर करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. महिला अध्यक्षा जयवंती लोणे यांनी सांगितले की, "वारंवार वीज खंडित होत असल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे.



विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होत असून व्यापारी वर्ग, लहान उद्योग तसेच रुग्णालयीन सेवांनाही फटका बसत आहे. नागरिकांना प्रचंड मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे." दरम्यान, महावितरणचे कनिष्ठ अभियंता योगेश चेंदवनकर यांनी नागरिकांच्या मागण्यांची दखल घेत लवकरच कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. "लाईन दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले असून सध्या वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला आहे. परिसरात दोन नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्याचे काम प्रस्तावित असून विजचोरी करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल," असे त्यांनी स्पष्ट केले. या आंदोलनात शंभूदुर्ग संघटनेचे पदाधिकारी, व्यापारी, रिक्षा संघटना, मेडिकल असोसिएशनचे सदस्य तसेच खडवली परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलनामुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. नागरिकांनी लवकरात लवकर प्रश्न मार्गी न लागल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही दिला आहे.

#### लाईन दुरुस्तीचे काम करण्यात आले पूर्ण

परिसरातील विविध तांत्रिक अडचणी तातडीने दूर करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. महिला अध्यक्षा जयवंती लोणे यांनी सांगितले की, "वारंवार वीज खंडित होत असल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होत असून व्यापारी वर्ग, लहान उद्योग तसेच रुग्णालयीन सेवांनाही फटका बसत आहे. नागरिकांना प्रचंड मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे." दरम्यान, महावितरणचे कनिष्ठ अभियंता योगेश चेंदवनकर यांनी नागरिकांच्या मागण्यांची दखल घेत लवकरच कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. "लाईन दुरुस्तीचे काम पूर्ण करण्यात आले असून सध्या वीज पुरवठा सुरळीत करण्यात आला .

» Selected

## पंतप्रधानांच्या आवाहनाचा ज्वेलरी कंपन्यांना फटका!

मुंबई: वाणिज्य प्रतिनिधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेला सोन्याची खरेदी टाळण्याचे किंवा ती मर्यादित करण्याचे आवाहन केल्यानंतर भारतीय शेअर बाजारात दागिन्यांशी संबंधित कंपन्यांच्या शेअर्समध्ये मोठी घसरण पाहायला मिळाली. पंतप्रधानांच्या या विधानामुळे सोन्याच्या मागणीत घट होण्याची शक्यता निर्माण झाली असून, त्याचा थेट परिणाम गुंतवणूकदारांच्या मानसिकतेवर झाला आहे. सोन्याच्या वाढत्या आयातीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर आणि परकीय चलन साठ्यावर होणारा परिणाम कमी करण्याच्या उद्देशाने हे आवाहन करण्यात आले असले तरी, शेअर बाजारात मात्र यामुळे ज्वेलरी क्षेत्रातील कंपन्यांचे शेअर्स लडखडून कोसळले आहेत. या घसरणीचा सर्वाधिक फटका 'टायटन' आणि 'कल्याण ज्वेलर्स' यांसारख्या दिग्गज कंपन्यांना बसला आहे. टायटनच्या शेअर्समध्ये मोठी घट नोंदवण्यात आली .

# अज्ञात माथेफिरूचा धुमाकूळ, 1,700 केळीचे घड कापून फेकले !

## अट्रावलच्या शेतकऱ्याचे सुमारे ६ लाखांचे नुकसान

जन सम्राट टाईम्स



**यावल | प्रतिनिधी:** तालुक्यातील अट्रावल येथील शेतकऱ्याच्या यावल शिवारातील केळीच्या बागेत अज्ञात माथेफिरूने घुसून तब्बल १ हजार ७०० केळीच्या झाडांवरील घड कापून फेकल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे संबंधित शेतकऱ्याचे सुमारे सहा लाख रुपयांचे नुकसान झाले असून शेतकरी वर्गातून संताप व्यक्त केला जात आहे.अट्रावल येथील शेतकरी किरण निळकंठ महाजन यांच्या मालकीचे शेत गट क्रमांक ५९४ मध्ये ९० आर क्षेत्रात सुमारे ३ हजार २०० केळीच्या खोडांची लागवड करण्यात आली होती. केळी कापणीसाठी तयार झाली असताना सोमवारी त्यांचे भाऊ प्रवीण महाजन हे शेतमजूर विकास नाले यांच्यासह शेतात गेले असता त्यांना मोठ्या प्रमाणावर केळीचे घड कापून जमिनीवर पडलेले दिसले. यानंतर किरण महाजन यांनी शेतात पाहणी केली असता ३ हजार २०० पैकी तब्बल १ हजार ७०० झाडांवरील केळीचे घड अज्ञात व्यक्तीने कापून टाकल्याचे निदर्शनास आले. नुकसान करण्याच्या उद्देशाने अज्ञात माथेफिरूने शेतात प्रवेश करून हा प्रकार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, गेल्या वर्षीदेखील अट्रावल व यावल शिवारात अशाच प्रकारे केळी बागांचे नुकसान करण्यात आले होते. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. .अट्रावल येथील शेतकरी किरण निळकंठ महाजन यांच्या मालकीचे शेत गट क्रमांक ५९४ मध्ये ९० आर क्षेत्रात सुमारे ३ हजार २०० केळीच्या खोडांची लागवड करण्यात आली होती. केळी कापणीसाठी तयार झाली असताना सोमवारी त्यांचे भाऊ प्रवीण महाजन हे शेतमजूर विकास नाले यांच्यासह शेतात गेले असता त्यांना मोठ्या प्रमाणावर केळीचे घड कापून जमिनीवर पडलेले दिसले.याप्रकरणी यावल पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक रंगनाथ धारबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार उमेश सानप करीत आहेत.

### अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल

किरण महाजन यांनी शेतात पाहणी केली असता ३ हजार २०० पैकी तब्बल १ हजार ७०० झाडांवरील केळीचे घड अज्ञात व्यक्तीने कापून टाकल्याचे निदर्शनास आले.अज्ञात माथेफिरूने शेतात प्रवेश करून हा प्रकार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, गेल्या वर्षीदेखील अट्रावल व यावल शिवारात अशाच प्रकारे केळी बागांचे नुकसान करण्यात आले होते. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अट्रावल येथील शेतकरी किरण निळकंठ महाजन यांच्या मालकीचे शेत गट क्रमांक ५९४ मध्ये ९० आर क्षेत्रात सुमारे ३ हजार २०० केळीच्या खोडांची लागवड करण्यात आली होती.

जन सम्राट टाईम्स | विशेष बातमी

## चीनला अमेरिकेच्या कार बाजारपेठेत प्रवेश देऊ नये!

जन सम्राट टाईम्स



**वॉशिंग्टन | प्रतिनिधी:** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे या आठवड्यात चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांची भेट घेणार आहेत. या अत्यंत महत्त्वपूर्ण बैठकीपूर्वी, अमेरिकेतील वाहन उद्योग आणि रिपब्लिकन व डेमोक्रॅटिक या दोन्ही प्रमुख राजकीय पक्षांच्या खासदारांनी ट्रम्प यांना एक स्पष्ट आणि कडक संदेश दिला आहे. या नेत्यांनी आणि उद्योग जगताने ट्रम्प यांना एकमुखाने आवाहन केले आहे की, चीनसोबतच्या कोणत्याही व्यापार चर्चेदरम्यान किंवा करारांतर्गत त्यांनी चीनला अमेरिकेच्या कार बाजारपेठेत कोणताही प्रवेश किंवा सवलत देऊ नये. अमेरिकन वाहन उद्योगाला अशी भीती आहे की, जर चिनी गाड्यांना अमेरिकेत सोपा प्रवेश मिळाला, तर देशांतर्गत ऑटोमोबाईल क्षेत्राला मोठा फटका बसेल आणि स्थानिक रोजगार धोक्यात येतील. याच कारणामुळे राजकीय मतभेद बाजूला ठेवून दोन्ही पक्षांचे लोकप्रतिनिधी या मुद्द्यावर एकत्र आले आहेत. अमेरिकन वाहन उद्योगाला अशी भीती आहे की, जर चिनी गाड्यांना अमेरिकेत सोपा प्रवेश मिळाला, तर देशांतर्गत ऑटोमोबाईल क्षेत्राला मोठा फटका बसेल ट्रम्प यांच्या या दौऱ्यात व्यापार आणि इतर अनेक मुद्द्यांवर वाटाघाटी होणार असल्या तरी, अमेरिकेच्या आर्थिक सुरक्षेच्या दृष्टीने देशांतर्गत वाहन उद्योगाचे संरक्षण करणे ही प्राथमिकता असली पाहिजे आणि या बाबतीत चीनशी कोणतीही तडजोड केली जाऊ नये, अशी ठाम भूमिका अमेरिकन कायदेमंडळ आणि ऑटो उद्योगाने मांडली आहे.

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

## मोहोने-खडकपाडा-दुर्गाडी बससेवेचा शुभारंभ

### राजेश वाघमारे यांच्या पाठपुराव्याला यश

जन सम्राट टाईम्स



**कल्याण | प्रतिनिधी:** मोहोने परिसरातील नागरिकांची दीर्घकालीन मागणी अखेर पूर्ण झाली असून कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिवहन विभागाच्या वतीने मोहोने–खडकपाडा–दुर्गाडी या नव्या बससेवेचा शुभारंभ मंगळवारी उत्साहात करण्यात आला. मोहोने गेट येथे सकाळी १० वाजता महिला, कामगार आणि स्थानिक नागरिकांच्या उपस्थितीत या बससेवेचे उद्घाटन झाले. या नव्या सेवेमुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून महिला व कामगार वर्गात समाधान व्यक्त केले जात आहे. या कामासाठी काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष राजेभाऊ पातकर, काँग्रेस पदाधिकारी आणि परिवहन विभागाचे सहकार्य लाभल्याचे राजेश वाघमारे यांनी सांगितले. “ही बससेवा सुरू झाल्याने मोहोने परिसरातील नागरिकांचा वेळ आणि प्रवास खर्च मोठ्या प्रमाणात वाचणार आहे. विशेषतः महिलांना, विद्यार्थ्यांना आणि कामगारांना याचा मोठा फायदा होईल,” असे त्यांनी नमूद केले. या नव्या बससेवेचा लाभ खडकपाडा, आधारवाडी आणि दुर्गाडी परिसरात जाणाऱ्या प्रवाशांना होणार आहे. घरकाम करणाऱ्या महिला, सुरक्षा रक्षक, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच सरकारी कार्यालये, पोलीस स्टेशन, रुग्णालये आणि शैक्षणिक संस्थांमध्ये जाणाऱ्या नागरिकांसाठी ही सेवा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. दुर्गाडी देवस्थान आणि दुर्गाडी किल्ला परिसरात जाणाऱ्या भाविक व पर्यटकांसाठीही हा प्रवास अधिक सोयीचा होणार आहे. जिल्हाध्यक्ष राजेभाऊ पातकर यांनी सांगितले की, “सार्वजनिक वाहतूक सेवा मजबूत झाल्यास सामान्य नागरिकांचे जीवन अधिक सुलभ होते. ही बससेवा म्हणजे मोहोने परिसरासाठी महत्त्वाचा टप्पा आहे.”


### यांची होती उपस्थिती

या कार्यक्रमाला काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मामा पगारे,दशरथ पाटील, विष्णु वाघमारे, मोहोने सुभाष पाटील, माजी भीमराव डोळस सुरेश सोनार, विजय परियार, नाना भालेराव, संध्या ठोसरएस.सी सेलचे जिल्हाध्यक्ष ॲड. अजिंक्य साळवे, नागेश भोईर, हरिश्चंद्र पाटील, अशोक काळपुंड, राजेश दीक्षित, वेंकटेशन, अशपाक शेख, बाळा बर्वे, विवेक घोडके, अजय रामचंद्रन, धर्मांना मेडी, उर्मिला भोईर, अश्विनी वाघमारे, सुजाता वाघमारे, दर्शना पानपाटील, मेहनाज शहा, वर्षा माने, रंजना उपदेशे, निर्मला गोडबोले, गणेश कोनकर, रमेश रोकडे, पांडुरंग वाघमारे, विजय बोरे, रोहिदास भालेराव रमेश भालेराव, रमेश नंबियार, बौद्धाचार्य गौतम मोरे, ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष उत्तम शेंडगे व इतर अनेक नागरिक उपस्थित होते.

## टँकरचालकास जाब विचारणे पडले महाग

### चौघांकडून दोन भावांना बेदम मारहाण

जन सम्राट टाईम्स



**अमळनेर | प्रतिनिधी:** भरधाव टँकर सावकाश चालवण्यास सांगितल्याचा राग मनात धरून चौघांनी दोन सख्ख्या भावांना बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना अमळनेर-पारोळा मार्गावरील सडावण गावाजवळ घडली. लोखंडी पट्टीने डोक्यावर वार करण्यात आल्याने दोघे गंभीर जखमी झाले असून याप्रकरणी अमळनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, युवराज शंकर मोरे (रा. शांताबाई नगर, अमळनेर) हे आयशर वाहनातून शिरसमणी (ता. पारोळा) येथे जात होते. सडावण येथील नायरा पेट्रोल पंपाजवळ अचानक रस्त्यावर पाणी मारणारा टँकर समोर आल्याने वाहन चालकाला अचानक ब्रेक मारावा लागला. त्यामुळे मोठा अपघात टळला. या प्रकारानंतर युवराज मोरे यांनी संबंधित टँकर चालकाला वाहन हळू चालवण्याची सूचना केली. मात्र, याच कारणावरून वाद निर्माण झाला. त्यानंतर टँकर चालकासह मुकेश संजय ठाकरे, संजय रुपचंद ठाकरे व अमोल नाना पाटील (रा. खोकरपाट, ता. अमळनेर) यांनी युवराज मोरे व त्यांचे भाऊ सुरेश मोरे यांना शिवीगाळ करत मारहाण केल्याचा आरोप आहे. वाद वाढल्यानंतर आरोपींनी लाथाबुक्क्यांसह काठीला बसविलेल्या लोखंडी पट्टीने दोघांच्या डोक्यावर वार केले. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. याप्रकरणी युवराज मोरे यांच्या फिर्यादीवरून अमळनेर पोलिसांत भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास हेड कॉन्स्टेबल राजेंद्र देशमाने करीत आहेत.

## शेतजमीन बटाईने देण्याच्या नियमात बदल

मुंबई: ग्रामीण भागात अनेकदा शेतजमीन तोंडी कराराने किंवा साध्या कागदावर बटाईने (भाड्याने) कसायला दिली जाते. यामुळे जमीन मालकाला आपली जमीन परत मिळण्याची भीती वाटते, तर जमीन कसणाऱ्या कष्टकरी शेतकऱ्याला त्यावर कोणतेही शासकीय लाभ मिळत नाहीत. ही अडचण दूर करण्यासाठी सरकारने नवीन नियम लागू केले आहेत. त्यानुसार, आता 'तोंडी' करार चालणार नाही, नोंदणी अनिवार्य राहील. यापुढे कोणतीही शेतजमीन भाड्याने किंवा बटाईने द्यायची असल्यास त्याचा नोंदणीकृत करार (रजिस्ट्रेशन) करणे बंधनकारक आहे. केवळ तोंडी किंवा साध्या कागदावरील करार आता कायद्याने मान्य धरले जाणार नाहीत. या करारात जमिनीचा कालावधी आणि मोबदला स्पष्टपणे लिहिलेला असावा.जमीन मालक आणि कसणारा शेतकरी यांच्यात काही वाद निर्माण झाल्यास, निवारण करण्याचे अधिकार तहसीलदारांना देण्यात आले आहेत.

## जिपीएस मित्र परिवाराच्या नेत्र शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

### 96 जणांची मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड

जन सम्राट टाईम्स



**पाळधी प्रतिनिधी :** मा.ना. गुलाबराव पाटील यांच्या मार्गदर्शनातून आणि जि.प. सदस्य प्रतापराव पाटील व विक्रम पाटील यांच्या पुढाकारातून जिपीएस मित्र परिवारतर्फे आयोजित करण्यात आलेल्या भव्य नेत्र तपासणी व मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिराला रविवारी नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला.
पहाटेच नागरिकांनी शिबिरस्थळी मोठी गर्दी केली. सकाळी सात वाजेपासून नोंदणीला सुरुवात झाली आणि दिवसभरात एकूण 290 रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. त्यापैकी 96 रुग्णांची मोतिबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड होऊन त्यांना पनवेल येथील सुप्रसिद्ध शंकरा नेत्र रुग्णालयात पाठविण्यात आले. रुग्णांच्या नोंदणीपासून तपासणी, निदान आणि पुढील प्रक्रियेपर्यंत स्वतंत्र व्यवस्था शिबिरात उपलब्ध होती. उपस्थित प्रत्येकासाठी नाश्ता व जेवणाची मोफत सोय करण्यात आली होती. संपूर्ण सेवा विनामूल्य दिल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.
दृष्टीदान या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून, अनेक रुग्णांनी व ज्येष्ठ नागरिकांनी नेत्यांचे आभार व्यक्त केले. समाजोपयोगी कामात सातत्याने पुढाकार घेणाऱ्या गुलाबराव पाटील, प्रतापराव पाटील व विक्रम पाटील यांच्या प्रयत्नांचे नागरिकांतून कौतुक होत आहे.
शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यासाठी शंकरा हॉस्पिटलची तज्ञ टीम, डॉ. राहुल चौधरी डॉ विजय ब्राम्हणे , असद अन्वर सायली उटेकर वैशाली राऊत पाळधी व चांदसर आरोग्य केंद्रातील कर्मचारी वृंद तालुका आरोग्य अधिकारी डॉ ऋषिकेश झंवर डॉ प्रीती पाटील संदीप पाटील हर्ष भट रिकुल चव्हाण तसेच जिपीएस मित्र परिवार, शिवसेना व युवासेना कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. जलपुरवठा क्षेत्रातील कार्यामुळे ‘पाणीवाला बाबा’ म्हणून ओळख निर्माण झालेल्या नेत्यांची आता नागरिकांमध्ये ‘दृष्टी देणारा बाबा’ म्हणूनही नवी प्रतिमा तयार होत असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## नदीत बैलगाडी उलटली; शेतकऱ्याचा बुडून दुर्दैवी मृत्यू

### पाण्याचा अंदाज न आल्याने दुर्घटना; एक बैलही दगावला, गावात हळहळ

जन सम्राट टाईम्स



**जळगाव प्रतिनिधी :** गिरणा नदीच्या पात्रातून बैलगाडी नेत असताना पाण्याचा अंदाज न आल्याने झालेल्या भीषण दुर्घटनेत वडनगरी येथील ५५ वर्षीय शेतकऱ्याचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. मंगळवारी सकाळी साडेसात वाजेच्या सुमारास ही हृदयद्रावक घटना घडली. दिलीप रामभाऊ कल्याणकर (वय ५५, रा. वडनगरी) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, दिलीप कल्याणकर आणि त्यांचे सहकारी चिंतामण नाईक हे दोघेही नेहमीप्रमाणे खेडी भोकर शिवारातील शेतात मजुरीसाठी बैलगाडीतून जात होते. गिरणा नदीचे पात्र ओलांडताना नदीतील खोल खड्ड्याचा अंदाज न आल्याने अचानक बैलगाडी उलटली. प्रसंगावधान राखत चिंतामण नाईक यांनी तात्काळ उडी घेत आपला जीव वाचवला.
मात्र दिलीप कल्याणकर यांना सावरण्याची संधी न मिळाल्याने ते खोल पाण्यात बुडाले. घटनेची माहिती मिळताच जळगाव तालुका पोलिसांसह स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत शोधमोहीम सुरू केली. तब्बल तीन तासांच्या अथक प्रयत्नांनंतर त्यांचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. या दुर्घटनेत एक बैलही पाण्यात बुडून मृत झाला, तर दुसरा बैल बचावला. मृतदेह बाहेर काढताच नातेवाईकांनी एकच आक्रोश केला. दिलीप कल्याणकर यांच्या पश्चात पत्नी, मुलगा आणि मुलगी असा परिवार आहे. या प्रकरणी जळगाव तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## नेरीनाका चौफुलीवर वाहतुकीचा बोजवारा

### बंद सिग्नलमुळे नागरिक त्रस्त



जन सम्राट टाईम्स

**जळगाव प्रतिनिधी :** शहरातील अत्यंत वर्दळीच्या नेरीनाका चौफुलीवर वाहतुकीची गंभीर समस्या निर्माण झाली असून वाहनधारक आणि नागरिकांना रोजच मनस्ताप सहन करावा लागत आहे. चौफुलीवरील ट्रॅफिक सिग्नल गेल्या अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत असल्याने येथे वाहतुकीचा पूर्ण बोजवारा उडाला आहे. परिणामी, या ठिकाणी सतत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागून कोंडी निर्माण होत आहे. नेरीनाका चौफुली ही टॉवर चौक आणि अजंठा चौफुलीला जोडणारी महत्त्वाची वाहतूक कडी मानली जाते. या मार्गावरून जड आणि हलक्या वाहनांची मोठ्या प्रमाणावर ये-जा सुरू असते. मात्र, सिग्नल यंत्रणा बंद असल्याने वाहनचालक बेशिस्तपणे वाहने चालवत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे किरकोळ अपघातांच्या घटनांमध्ये वाढ झाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या ठिकाणी वाहतूक पोलिस तैनात असले तरी वाढत्या गर्दीसमोर त्यांचे प्रयत्न अपुरे पडत आहेत. सिग्नल यंत्रणा केवळ शोभेची वस्तू ठरत असल्याची प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.दरम्यान, काही दिवसांपूर्वी वाहतूक शाखेला लेखी निवेदन देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, प्रशासनाकडून अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. नेरीनाका चौफुलीवरील वाहतूक सुरळीत करण्यासाठी तातडीने ट्रॅफिक सिग्नल सुरू करावेत तसेच अतिरिक्त पोलिस बंदोबस्त तैनात करावा, अशी मागणी आता जोर धरत आहे.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज

## उन्हाळी सुट्ट्यांत मुलांसाठी संस्कार, शिक्षण आणि मनोरंजनाचा संगम

### पवित्र नाम देवालय चर्चतर्फे सात दिवसीय ‘व्हॅकेशन बायबल स्कूल’ शिबिर उत्साहात संपन्न

जन सम्राट टाईम्स



**पुणे | प्रतिनिधी :** पुण्यातील गुरुवार पेठ येथील पवित्र नाम देवालय चर्चच्या वतीने उन्हाळी सुट्ट्यांचा सदुपयोग व्हावा या उद्देशाने आयोजित करण्यात आलेले विशेष व्हॅकेशन बायबल स्कूलशिबिर अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. सात दिवस चाललेल्या या शिबिरात परिसरातील सुमारे ८० हून अधिक मुला-मुलींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या शिबिरामध्ये मुलांसाठी आध्यात्मिक, शैक्षणिक आणि मनोरंजक उपक्रमांची आकर्षक मेजवानी ठेवण्यात आली होती. बायबलमधील प्रेरणादायी कथा, सुमधुर गाणी, नृत्य, लघुनाटिका तसेच विविध प्रकारच्या कलाकुसरीच्या वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षण मुलांना देण्यात आले. मुलांमधील सुप्त कला आणि सर्जनशीलतेला वाव देत त्यांच्यावर सुसंस्कार घडविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. शिबिराच्या सांगता समारंभाला पालकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती लाभली. यावेळी मुलांनी शिबिरात शिकलेल्या कला, नृत्य आणि नाट्यप्रयोग सादर करून उपस्थितांची मने जिंकली. चर्चचे मुख्य पाळक रेव्ह. कॅरप, रेव्ह. गायकवाड, रेव्ह. प्रमुख पाहुण्या सौ. बबिता कवाडे यांनी सहभागी मुलांचे आणि शिक्षकांचे कौतुक करत त्यांना प्रोत्साहन दिले. समारोपावेळी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे आणि आकर्षक बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. या उपक्रमाबद्दल पालकांनी चर्च प्रशासनाचे आभार व्यक्त करत अशा शिबिरांची आजच्या काळात मोठी गरज असल्याची भावना व्यक्त केली.

### उपस्थित महिलांना मार्गदर्शन

या यशस्वी शिबिरासाठी रेव्ह. कॅरप, रेव्ह. गायकवाड, रेव्ह. आढाव यांच्यासह मनोज येवलेकर, प्राजक्ता पारोळ, विकास उमापती, विजया इंदुरकर, रोजमेरी साठे, निखिल टाकळकर, मालती नॉर्टन, जयमाला सूर्यवंशी आणि अन्य स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. सात दिवस चाललेल्या या शिबिरात परिसरातील सुमारे ८० हून अधिक मुला-मुलींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या शिबिरामध्ये मुलांसाठी आध्यात्मिक, शैक्षणिक आणि मनोरंजक उपक्रमांची आकर्षक मेजवानी ठेवण्यात आली होती.